राष्ट्रीय जयते

# जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि. अमरावती

## वार्षिक अहवाल

## २०१०-११




मुख्य कार्यालय : १ ला मजला, खत्री कॉम्प्लेक्स, वॉलकट कम्पाउंड, अमरावती. फोन : २५६००५७, २५७००५६, २५६६१५६

# जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि. अमरावती

मुख्य कार्यालय : १ ला मजला, खत्री कॉम्प्लेक्स, वालकट कम्पाउंड, अमरावती. फोन : २५६०७५३, २५६०७५६, २५६६१५६

राष्ट्रमाता जयते

## दि. ३०.४.२०११ पासून कार्यरत संचालक मंडळ : २०११-२०१६

| | | | |
|---|---|---|---|
| १ | इंजि./ अरविंद दत्तात्रय गावंडे<br>B. E. (Civil.), DIT | अध्यक्ष | ९४२३१२४६७१ |
| २ | सौ. किरणताई उमेशराव महल्ले<br>M.A., L.L.B. | उपाध्यक्ष | २६६११९७६ |
| ३ | इंजि.अविनाश अंबादासराव कोठाळे<br>MIE, LL.B., ADIM, DMM | संचालक | २५४११२५, २५४०१८८<br>९४२३१२३३१४ |
| ४ | इंजि. राजेंद्र शंकरराव जाधव<br>B. E. (Mech.) | संचालक | २५१०३५२, ९८२३०३५३८२ |
| ५ | डॉ.सौ. प्रतिभाताई विधळे<br>M.Sc. Ph. D. | संचालिका | २६६३७१६ |
| ६ | इंजि. प्रदीप चतुरसिंग वानखडे<br>B. E. (Civil), DBM | संचालक | ९३७२७५७५४२ |
| ७ | इंजि. सतिश रामदासराव काळमेघ<br>B. E. (Comp.) MBA | संचालक | ९४२२८५७०७१ |
| ८ | सौ. सुजाताताई भाऊराव वावरे<br>M. A. | संचालिका | २५३१००६ |
| ९ | ॲड. रवींद्र पुंडलिकराव तायडे<br>M. Com. L.L.B. | संचालक | ९३२५५३७०८५ |
| १० | इंजि. राजेंद्र पुंडलिकराव अढाऊ<br>D.C.E. B.E. (Civil) | संचालक | ९३७०१५४३५५ |
| ११ | शरद अमृतराव बंड<br>M. Sc. | संचालक | ९४२१७९०७६६ |
| १२ | श्री संजय विश्वनाथराव ढोरे<br>B. A. | संचालक | २६६४६८९ |
| १३ | श्री अनिल अनंतराव टाले<br>D.E. Engg., D. Pharm. | संचालक | २५९१०४२ |
| १४ | इंजि. प्रमोद भिमरावजी बोके<br>B. E. (Civil) M.E. (Structure), E.I.E. | संचालक | ९४२२९५६६०५ |
| १५ | श्री सुनील रामकृष्णराव चापके<br>M.Sc. (Agri.), A.H.D. | संचालक | ९४२०१२८८४८, ९९६०६९९७७५ |
| १६ | श्री चैतन्य कृष्णराव इंगळे<br>Chartered Accountant | संचालक | ९४२२८८८२३७ |

# जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती

मुख्य कार्यालय : १ ला माळा, खत्री कॉम्प्लेक्स् वालकट कंपाऊंड, अमरावती
फोन - २५६००५७, २५७००५६, फॅक्स (०७२१) २५६६१५६
नोंदणी क्रमांक : एटीआय/बिएनके/(ओ)/३१२/९९ दि. ३१.०३.१९९९


अंडर सर्टीफीकेट ऑफ पोस्टींग

क्र. जिजाऊ/आमसभा/११/७१८/२०११
आषाढ कृ. १४ शके १९३३, शिवशके ३३८
दि. २९ जुलै २०११

सन्माननीय,

भागधारक सभासद, बंधु / भगिनींनो,

सस्नेह जय जिजाऊ,

जिजाऊ कमर्शियल को-ऑप बँक लि., अमरावती ची **११ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. १४ ऑगस्ट, २०११ रोजी सायंकाळी ५.०० वाजता, राजवाडा सभागृह, हॉटेल गौरी इन, मोर्शी रोड, अमरावती** येथे खालील विषयानुसार कामकाज चालविण्या करीता **आयोजित केलेली आहे.** तरी आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

संचालक मंडळाचे आदेशान्वये
**शरद शे. मोकसे**
मुख्य कार्यपालन अधिकारी

**सभेची विषय पत्रिका :**

१. मागील आमसभा दि. १४.०८.२०१० चे इतिवृत वाचून मंजूर करणे.
२. सन २०१०-२०११ (३१ मार्च २०११) अखेर वार्षिक अहवाल हिशोबाची पत्रके, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक मंजूर करणे.
३. सन २०१०-११ ह्या वर्षात झालेल्या नफ्याचे विनियोजनास मंजूरात देणे.
४. बँकेचे सन २०११-१२ ह्या वर्षाचे अंदाज पत्रक मंजुर करणे. २००९-२०१० चे प्रत्यक्ष खर्चास मंजूरात देणे.
५. बँकेची बाहेरील कर्ज उभारणीची मर्यादा ठरविणे.
६. बँकेचे अंतर्गत तपासणी करीता ऑडीटरची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
७. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकाकडील कर्ज प्रकरणाची नोंद घेणे.
८. २०१०-२०११ चे ऑडीट नोट अवलोकन करणे व रिझर्व बँकेचे निरिक्षण अहवालावरील त्रुटी पुर्तता अहवालाचे अवलोकन करणे.
९. एकरकमी परतफेड कर्जप्रकरणांना मंजूरी देणे.
१०. निवडक थकित कर्ज प्रकरणांना राईट ऑफ करण्यास मंजूरी देणे
११. मा. अध्यक्षाचे परवानगीने वेळेवर येणारे विषय.

---

टिप - १. गणपूर्ती अभावी तहकुब झालेली सभा लगेच १ तासा नंतर त्याच दिवशी त्याच विषयावर त्याच ठिकाणी घेण्यात येईल त्या सभेस गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. बँकेचे कामकाजा विषयी सभासदांना प्रश्न विचारावयाचे असल्यास असे प्रश्न लेखी स्वरुपात सभेपूर्वी ३ दिवस अगोदर पाठवावे व पोच घ्यावी.
३. बँकेच्या भागधारकांनी बचत खाते उघडून लाभांश धनादेश बचत खात्यामध्ये जमा करावेत, बँकेत ज्या भागधारकांचे बचत खाते आहे त्यांच्या खात्यात लाभांश जमा केला आहे.
४. भागधारकांनी वारसाची (नॉमिनी) नोंद बँकेच्या दप्तरी करावी व भाग प्रमाणपत्राकरीता अचूक पत्ता बँकेत नोंदवावा. ३१ मार्च २०११ च्या स्थितीवर भाग प्रमाणपत्राचे अनुक्रमांक सुधारित करण्यात आले. पुर्वी दिलेले भाग क्रमांक रद्द समजण्यात यावे.

# जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती

मुख्य कार्यालय : १ ला माळा, खत्री कॉम्प्लेक्स् वालकट कंपाऊंड, अमरावती.

फोन - २५६००५७, २५७००५६, फॅक्स (०७२१) २५६६१५६


प्रेषक : अभियंता अरविंद दत्तात्रय गावंडे
अध्यक्ष

अमरावती
२९ जुलै २०११
आषाढ कृ. १४ शके १९३३,
शिवराज्याभिषेक, शके ३३८

सन्माननीय सभासद
सहकार बंधु व भगिनिंनो,

**आदरपुर्वक जय जिजाऊ !**

**सुस्वागतम्-स्वागतम्-सुस्वागतम् !**

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक अमरावती चा सन २०१०-११ चा वार्षिक अहवाल आपणास संचालक मंडळाचे वतीने सादर करतांना मला आनंद होत आहे.


उदारिकरणाच्या झंझावातात टिकायचे असेल तर झपाट्याने बदल आवश्यक असतो. बदलायचे असेल तर अर्थ पाहिजे. अर्थाशिवाय अर्थ नाही. समाजासमोर पर्याय नाही. अशावेळी मराठा सेवा संघाच्या अर्थकक्षाच्या माध्यमातून म.से. संघ चे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर ह्यांचे प्रेरणेतून व मार्गदर्शनातून शिवश्री अविनाश कोठाळे ह्यांचे नेतृत्वात जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेची सुरवात दि. ७ ऑक्टो २००० ला करण्यात आली. तत्कालीन संचालक मंडळ व भागधारक ह्यांच्या संघटन शक्तीतून लोककल्याणाचा वसा घेऊन, नव्या आर्थिक क्रांतीकडे जाणारी ही बँक आपल्या सर्वांच्या सहकार्याने व वरिष्ठांच्या मार्गदर्शनातून यशस्वीतेकडे वाटचाल करित आहे. गेल्या दहा वर्षात आपण दाखविलेल्या विश्वासामळे, ठेविदारांनी बँकेवर केलेले अतुट प्रेम, कर्जदारांनी नियमित परतफेड करून दाखविलेली तत्परता, बँकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेली अविश्रांत मेहनत, ह्यामुळेच बँकेची वाखनण्याजोगी प्रगती होऊ शकली.

पारदर्शक व चागले नेतृत्व करणारी बँक म्हणून बँकेचा लौकीक आहे. गेल्या दहा वर्षात बँकेत सचालक मंडळ अविरोध निवडून येत आहे. ह्याचा अर्थ स्पर्धा नाही असे नसून योग्य उमेदवारांसाठी माजी संचालकांनी स्वतःहून बाजूला होऊन अविरोध संचालक निवडलेत ह्यांचे संपूर्ण श्रेय मी संस्थापक अध्यक्ष शिवश्री अविनाश कोठाळे ह्यांनाच देतो. ज्या उद्देशाने व सामाजिक बांधिलकीतून बँकेची स्थापना झाली ते कार्य जबाबदारीने व पूर्ण कार्यक्षमतेने पार पाडण्यास सर्व संचालक मंडल खूप कशोशिने प्रयत्न करित आहे. विशेषतः बँकेची थकबाकी वसूल करण्यासाठी व ठेवी वाढविण्यासाठी आपण सर्वांनी, हितचिंतक व बँकेचे अधिकारी /कर्मचारी ह्यांनी दिलेले सहकार्य अधिक मोलाचे आहे. त्यामुळे या सर्वांच्या प्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो. आपण सर्वांनी संचालक मंडळावर जो टाकलेला विश्वास व श्रध्दा यामुळेच बँके असंख्य ठेविदारांचा विश्वास संपादन करून प्रगतिच्या दिशेने मोठी झेप घेऊ शकली. बँकेला मिळालेला ऑडीट वर्ग अ त्याचेच द्योतक होय.


सामाजिक मूल्ये जपतांना तसेच स्टेट्युटरी ऑडीट मध्ये "अ" वर्ग सतत टिकवून ठेवतांना समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करणे, शिवजयंती व जिजाऊ जन्मोत्सव, पत नसलेल्यांना कर्ज देऊन त्यांना व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहन देणे, उच्च शिक्षणासाठी कर्ज देणे, विद्यार्थ्यांकरिता जिजाऊ बुध्दीबळ स्पर्धा आयोजीत करणे इ. सामाजिक कार्ये बँकेमार्फत करण्यात येतात. ज्यांना ह्या सामाजिक कार्याचा लाभ होतो त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य बघतांना समाज कार्यात हातभार लावल्याचे समाधान लाभते हे आपणास सांगतांना अभिमान वाटतो. **बँकेच्या ११ व्या वार्षिक आमसभेत आपले सर्वांचे मन:पुर्वक स्वागत !**

## -: बँकेची प्रगती भागभांडवल व निधी :-

### ◉ भागभांडवल :





बँक स्थापनेसमयी १७१६ सभासद व २४.९६ लक्ष भागभांडवलावरून सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षामध्ये ३४२.४४ लक्ष भागभांडवल आहे मागील वर्षाच्या रू. २९७.८२ लक्षाच्या तुलनेत ४४.६२ टक्के वाढ आहे. सभासद संख्येमध्ये ३७३४ वरून ३९५८ वाढ अहवाल वर्षात आहे. भागधारकांना गुंतवणुकीवरील सुयोग्य परतावा लाभांश धनादेश धरपोच मिळत असल्याने त्यांचा विश्वास वृध्दींगत होत असल्याची ही पावती आहे.




### ◉ निधी :

राखीव व इतर निधी मध्ये इमारत निधी, लाभांश समिकरण निधी, वाईट व संशयित निधी तरतुद, घटघट निधी, गुंतवणूक व जोखिम निधीचा समावेश असुन सन २०१०-२०११ या अहवाल वर्षात निधी रू. १०५६.२६ लक्ष आहे. सदर निधीमध्ये रू. ५८.८० लक्ष वाढ आहे. सदर निधी अत्यंत उपयुक्त आहे.




### ◉ ठेवी :

सन २०१० मध्ये रू. ६१३३.१३ लक्ष ठेवी होत्या त्यामध्ये ५३१.५२ लक्ष वाढ होवून अहवाल वर्षात एकूण रू. ६६६४.६५ लक्ष ठेवी आहेत. ठेवीमध्ये ८.९० टक्के वाढ ठेवीदारांचा बँकेवर असलेल्या विश्वासार्हतेचे प्रतिक आहे. ठेवीदारांचे अतुट प्रेम व विश्वास वृध्दिंगत होईल हा विश्वास संचालकांना विश्वसाच्या नात्याने आहे.


**जिजाऊ बँकेची प्रगती व सांपत्तीक स्थिती खालील तक्त्यावरून अधिक स्पष्ट होईल.** (आकडे लाखात)

| वर्ष | सभासद | भागभांडवल लक्ष रू. | राखीव व इतर निधी लक्ष रू. | ठेवी लक्ष रू. | कर्ज | गुंतवणूक | खेळते भांडवल | निव्वळ नफा लक्ष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०००-०१ | १८८५ | ३१.४८ | २.१४ | २६२.१८ | २०३.८४ | ३७ | ३०७.३० | १५.०२ | ७ ऑक्टो. २००० मधून बँक सुरू झाली. |
| २००१-०२ | १९८० | ५१.३१ | ९.४० | ६२५.०८ | ६००.८१ | १०३ | ६३१.८३ | १०.६३ | |
| २००२-०३ | २१९८ | ६२.७० | २३.५८ | १०१३.८६ | ७९१.१० | २५१.६२ | १२०४.७४ | १२.३४ | |
| २००३-०४ | २३०३ | ८६.६४ | ४२.५३ | १४४२.३७ | १००३.५० | ४९८.८० | १५५०.९२ | ४०.३१* | *आयकर प्रतिपुर्तिनंतर नफा मागील |
| २००४-०५ | २४४६ | १०२.७४ | ११६.२० | १६८३.५७ | १२०१.३१ | ३८५.२६ | २०९५.६६ | २०.०३ | |
| २००५-०६ | २७११ | ११६.४१ | २२८.३६ | २५६१.५४ | १६३६.७४ | १२०५.९६ | २६६३.४२ | २४.१० | |
| २००६-०७ | ३१३८ | १३०.०३ | २६४.८८ | ३९००.१३ | २१६२.७४ | १४२४.४६ | ४०५१.६३ | ४३.८३ | संपूर्ण संगणकीकृत बँक |
| २००७-०८ | ३३३४ | २०२.५६ | ४३५.४६ | ४८३५.६१ | ३३४३.३३ | १४०३.५६ | ४९६३.९६ | ४२.३० | सहकारी बँकेत अग्रणी बँक |
| २००८-०९ | ३४९९ | २३५.०३ | ७८९.३५ | ५२४८.११ | ३६३०.१० | २२९६.४६ | ३८६५.२१ | ४७.६१ | सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार |
| २००९-१० | ३७३४ | २९७.८२ | ९९०.४६ | ६१३३.१३ | ४०३३.५२ | २९११.०८ | ८०२५.२१ | ६३.२२ | १५% लाभांश |
| २०१०-११ | ३९५८ | ३४२.४४ | १०५६.२६ | ६६६४.६५ | ४९८२.३५ | ३४६४.१२ | ८०४४.८५ | ६१.६० | १५% लाभांश |

## ● ठेवीदारांची सुरक्षितता :

ठेवीच्या सुरक्षेकरीता रिझर्व बँकेचे उपक्रमाअंतर्गत ठेव विमा आणि जमा गॅरंटी महामंडळाकडे (DICGC) नियमीतपणे बँक जुन व डिसेंबरच्या शेवटच्या शुक्रवारी असलेल्या सर्व ठेवीवर विमा प्रिमियम अर्धवार्षिक जमा करते. अहवाल वर्षात रू. ७.१६ लक्ष प्रिमीयम भरला आहे. बँकेचे एकूण डिपॉझिटवर अर्धवार्षिक प्रिमियम आहे. ठेवीदारांचे प्रत्येकी एक लक्ष रूपये महामंडळाकडून सुरक्षित करण्यात आले आहे. ग्राहकांची सुविधा अबाधित आहे.

## ● बँकामधील गुंतवणुक :




रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार २५% शासकीय प्रतिभुतिमध्ये गुंतवणुक करण्याबाबत निर्देश आहेत. मार्च २०११ पर्यंत शासकिय प्रतिभुती मध्ये २५ % गुंतवणुक अनिवार्य होती. त्यानुसार अहवाल वर्षात विविध बँकामध्ये जिजाऊ बँकेची एकुण रू. ३४६७.७१ लक्ष गुंतवणूक आहे. शासकीय प्रतिभुतिमधील रू. १८२२.७६ लक्ष गुंतवणूक आहे व रू. ४०.०० लक्ष स्टेट बँकेमध्ये, रू. ५७०.९६ लाख अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अमरावती, रू. ३६५.५० लाख दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व इतर बँकेत रू. ६६७.७९ लाख ठेवी आहेत. इतर विनिर्दिष्ट बँकामध्ये केलेली गुंतवणूक ४८.८९ टक्के आहे. बँकेच्या ठेवी रू. ६६६४.६५ लक्ष ३१ मार्च २०११ ला असलेल्या Net Demand and Time Liability (NDTL) नुसार आहे. बँकामधील सर्व ठेवी सुरक्षित आहेत त्यावर बँकेला सरासरी ९.३८ टक्के व्याज मिळते. संचालक मंडळाने बँकेचे गुंतवणुक धोरण मंजूर केले असून त्यानुसार बँकेचे फंडावर व्याज मिळण्याच्या दृष्टीने सुयोग्य गुंतवणुक करण्याचे अधिकार मुख्य कार्यपालन अधिकारी यांना प्रदान केले आहे.

## ● शासकीय प्रतिभुतीमधील गुंतवणूक :

बँकेने एकूण रूपये १८२२.७६ लक्ष गुंतवणूक शासकीय प्रतिभुती मध्ये रिझर्व बँकेने निर्देशीत केल्यानुसार केली. शासकीय रोख्यांचे दर्शनी किंमतीमध्ये घट झालेली आहे. बँकेकडे असलेल्या शासकीय रोख्यांचे विवरण HTM, HFT व HFS, या वर्गवारीमध्ये खालील प्रमाणे आहे.

(आकडे लाखात)

| Sr. No. | Held to Maturity (HTM) | Held for Trading(HFT) | Held to Sale (HFS) | ३१ मार्च २०११ चे दर |
|---|---|---|---|---|
| 1. | 7.46 GOI 2017 Rs. 50.00 | Nil | Nil | 97.46 |
| 2. | 5.69 GOI 2018 Rs. 35.60 | | | 87.45 |
| 3. | 6.01 GOI 2028 Rs. 80.70 | | | 78.61 |
| 4. | 6.13 GOI 2028 Rs. 75.00 | | | 87.88 |
| 5. | 6.17 GOI 2023 Rs. 90.00 | | | 84.75 |
| 6. | 6.25 GOI 2018 Rs. 150.00 | | | 95.47 |
| 7. | 7.95 GOI 2032 Rs. 97.15 | | | 91.62 |
| 8. | 8.24 GOI 2027 Rs. 398.79 | | | 99.20 |
| 9. | 8.28 GOI 2032 Rs. 299.23 | | | 98.88 |
| 10. | 8.32 GOI 2032 Rs. 100.00 | | | 99.15 |
| 11. | 8.26 GOI 2027 Rs. 446.29 | | | 99.35 |
| | TOTAL Rs. 1822.76 | Nil | Nil | सरासरी ९२.७१ |

शासकीय प्रतिभुतीचे दर्शनी मुल्य रू. १००/- आहे. सदर एस.टी.एल. वर्गवारीमध्ये ठेवलेल्या रोख्यांवर निर्देशित व्याज मिळत आहे. बँकेला शासकिय प्रतिभुतीमधील व्याज मिळकतीमध्ये तोटा येत आहे. नियमानुसार सदर तोट्याकरिता Investment Depreciation Reserve फंड निर्माण केला असुन त्यामध्ये रू. ८.८५ लक्ष ची तरतुद आहे तसेच शासकिय प्रतिभुतीची दर कमी असल्याने सदर तोट्याचे सम योजना करीता Investment Fluctuation Fund रू. ३१.२२ लक्ष आहे.

बँकेची नॉन एस.एल.आर. गुंतवणूक महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या भाग रू. १००००/- व अमरावती जिल्हा सहकारी अधिकोषात रू. १००० असे एकूण रू.०.११ लक्ष आहे. अहवाल वर्षात ३१ मार्च ला Non SLR गुंतवणुक रू. ७०७.९० लक्ष आहे, तसेच LIC Liquid fund मधुन Non SLR गुंतवणुकी मधुन उत्पन्न मिळाले आहे.

## ◉ ठेवीवरील देणे व्याज :

ठेवीदाराचे देणे देय दिनांकाला मिळणेकरता अहवाल वर्षात व्याजाची तरतुद रू. ४६४.१७ लक्ष केली आहे. ठेवीवर बँक सरासरी ६.९६% पर्यंत मुदतीनुसार व्याज ग्राहकांना देते. जेष्ट नागरिकांना ०.५०% टक्के बँक व्याज जास्त देते. इतर राष्ट्रीयकृत बँकांपेक्षा १% जास्त व **सुसंचालीत सहकारी बँकांपेक्षा** ०.२५% जास्त व्याज दर ठेवीदाराला योग्य परतावा मिळावा या दृष्टीने दिलेला आहे. स्पर्धेमध्ये ठेवीवरील व्याजदर इतर बँकाप्रमाणेच असणे निकोप वृध्दीकरिता गरजेचे आहे.

## ◉ रोखनिधी व तरती जिंदगी :

सहकारी बँकांनी रिझर्व बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ मधील कलम १८ व २४ नुसार रोख निधी (CRR) ३% व तरती जिंदगी (SLR) २५% राखणे अनिवार्य असल्याने बँकेने वर्षभर विहीत मर्यादा नियमानुसार राखून आर.बी.आय. च्या निर्देशाचे पालन केले आहे. सदर प्रमाण अधिक बाजूस असल्याने अधिक व्याज आकर्षणाने Non SLR गुंतवणुक वाढविणे आवश्यक आहे. शासकिय प्रतिभुती मध्ये अहवालवर्षात रू. १८२२.७८ लक्ष गुंतवणूक करून २५ टक्केची पुर्तता केली आहे.

## ◉ कर्जव्यवहार व कर्ज वितरण :

बँकेने एकूण २०३१ ग्राहकांना ४५८२.३१ लक्ष कर्ज वाटप केले आहे. अहवाल वर्षात ५५८.८२ लक्ष कर्जात वाढ झाली आहे व कर्ज वाटपातून बँकेला ४६५.३१ लक्ष व्याज मिळाले आहे. RBI चे धोरणानुसार एक्सपोझर लिमिट अंतर्गत बँकेने प्रतिव्यक्तिला महत्तम ६० लक्ष कर्ज तर कंपनी व एकत्रित कर्ज १७० लक्ष मर्यादा निर्धारित केली आहे. बँकेने अहवाल वर्षापर्यंत एकूण रूपये ४५८२.३१ लक्ष कर्जवाटप एकुण २०३१ सभासदांना केले. त्यामध्ये अहवाल वर्षात एकुण ५५८.८२ लक्ष कर्ज कर्जदारांना वाटप केले व ३३३ सभासदांनी ४२७.८७ लक्ष कर्ज परत केले. प्रामुख्याने सदर कर्जापैकी रू. ९९९.२७ लक्ष (२१.८२%) हे कॅश क्रेडीट, रू. ११९४.८९ लक्ष (२६.०८%) हे गृहबांधणी, घरदुरूस्ती, फ्लॅट घेणे इत्यादी वरील असून ६२४.२७ (१३.६२%) वैयक्तिक तारणावर कर्ज दिले आहे. रू. ५२१.११ लक्ष (११.३७%) वाहन कर्जावरील आहे. शेती विकत घेणे, विकास करणे, पिक कर्ज /मुदती ठेवीवर एकूण रूपये १०१३.२३ लक्ष (२२.११%) आहे. तसेच तारणावर कर्ज रू. २२८.८८ लक्ष (४.९९%) आहे. गृह बांधणी कर्ज १० % पर्यंतचे खेळते भांडवल मर्यादेपर्यंत करण्याचे RBI चे निर्देश आहेत. त्या दृष्टिने सातत्याने गृहकर्ज कमी करण्याचा प्रयत्न सुरू आहे.



### बँकेचे कर्ज वाटप रक्कम निहाय वर्गवारी खालीलप्रमाणे आहे

| अ.क्र. | कर्ज रक्कम (रूपये मध्ये) | एकुण कर्जदार | टक्केवारी | कर्ज वाटप | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २५००० पर्यंत | ५०० | २४.६२ | ६५.५८ | १.४३ |
| २. | २५००१ ते ५०००० पर्यंत | ३८० | १८.७१ | १३२.४८ | २.९८ |
| ३. | ५०००१ ते १००००० पर्यंत | २३२ | ११.४२ | १७४.४३ | ३.८१ |
| ४. | १००००१ ते २००००० पर्यंत | ३०५ | १५.०२ | ४१९.३४ | ९.१५ |
| ५. | २००००१ ते ५००००० पर्यंत | ३८९ | १९.१५ | १२३६.५६ | २६.९९ |
| ६. | ५००००१ ते १०००००० पर्यंत | १५३ | ७.५३ | १०५४.१२ | २३.०० |
| ७. | १००००००१ ते २०००००० पर्यंत | ४५ | २.२२ | ६२२.४४ | १३.५८ |
| ८. | २००००००१ ते २५००००० पर्यंत | १२ | ०.५९ | २७२.६८ | ५.९६ |
| ९. | २५०००००१ ते ५०००००० पर्यंत | ९ | ०.४४ | २६१.६९ | ५.७० |
| १० | ५००००००१ चे वरील | ६ | ०.३० | ३३८.९२ | ७.४० |
| | एकूण | २०३१ | १००.०० | ४५८२.३५ | १००.०० |

**अहवाल वर्षात बँकेने रिझर्व बँकेच्या मापदंडानुसार अग्रक्रम क्षेत्रास रू. ३२११.८७ लक्ष कर्ज वाटप करून निर्धारीत ७० टक्के मापदंड साध्य केले आहे.** तर दुर्बल घटकास रू. ८१९.३१ लक्ष कर्ज वाटप केले. बँकेचे ६४.३८ % कर्ज हे १० लक्ष मर्यादेमधील असून ९६.४५ टक्के कर्जदाराकडे आहे. व उर्वरित ३५.६२% कर्ज ३.५५% कर्जदारांकडे आहे. बँकेच्या कर्ज मागणी मध्ये समप्रमाणात आणण्याचा प्रयत्न आहे.

**नियमित कर्ज परतफेड व चांगल्या कर्ज धारकांकरिता बँकेने १% सुट व्याजदरात देण्याचा निर्णय चालु आहे.** चांगल्या ग्राहकांची कर्ज मागणी वाढावी हा या मागचा उद्देश आहे. नियमित परतफेड करणाऱ्या चांगल्या कर्जदारांचे बँकेत स्वागत आहे. कर्जावे व्याजदरात इतर बँकामधील चढाओढ लक्षात घेता बँकेला सुद्धा त्यानुसार कार्यवाही करावी लागते.

### बँकेने कर्जप्रकारनिहाय वाटप केलेल्या कर्जाचा वार्षिक गोषवारा

(आकडे लाखात)

| अ.क्र | कर्जाचा प्रकार | ०४-०५ | ०५-०६ | ०६-०७ | ०७-०८ | ०८-०९ | ०९-१० | १०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कॅश क्रेडीट | ६६८.६९ | ७६८.७१ | ९१९.८० | ११३५.७२ | १२२२.३४ | ११७४.८६ | ९९९.९७ |
| २ | गृह तारण | २२४.२२ | २७१.५८ | ४०८.०१ | ८८९.३१ | ११७१.३४ | १०६२.५३ | ११९४.८९ |
| ३ | व्यावसायिक तारण | २५४.५५ | ३३१.२४ | ३००.०० | ४४२.६१ | ४५४.२६ | ४३२.३२ | ६२४.३७ |
| ४ | हयपोथिकेशन | ३६.२९ | १२२.११ | १६९.०१ | २२५.५१ | २८४.३० | ३५५.७७ | २२८.८८ |
| ५ | वाहन कर्ज | ५६.२३ | ५५.०१ | १२२.६१ | ३०८.४४ | ३४२.९० | ३३४.५२ | ४२१.११ |
| ६ | वैयक्तिक | ७.५१ | ६.६२ | ६.९८ | ८.०३ | ९.२३ | १८.२३ | ३५.५२ |
| ७ | मुदतठेव तारण | ४३.०६ | १०६.८२ | ७७.४८ | ६०.२५ | १०४.३६ | १०३.६२ | १२१.५४ |
| ८ | शासकीय सेक्युरिटी | ५.१२ | १३.६३ | ६९.०३ | १०२.२२ | ४३.१२ | ४०.८९ | २५.९३ |
| ९ | बिल डिस्कौंटींग | ५.४४ | -- | ०.३२ | ०.३३ | -- | -- | -- |
| १०. | इतर स्टाफ कर्ज | ०.९० | ०.१२ | ०.४५ | १.२१ | १.५२ | १.१७ | १.७९ |
| ११. | शेती कर्ज | -- | -- | १९.९० | ५०.७७ | १५६.१३ | १४७.३७ | २११.०३ |
| १२. | शैक्षणिक कर्ज | -- | -- | -- | ५.०१ | ३६.३६ | ३४.७५ | ३७.१० |
| १३. | सोने तारण कर्ज | -- | -- | -- | ३.५५ | १४.८२ | २८.६४ | ९५.३७ |
| १४. | लोनअगेन्स्ट प्रॉपर्टी | -- | -- | -- | -- | -- | २७२.६८ | ३१०.७२ |
| १५. | सीसी एफ.डी.आर. | -- | -- | -- | -- | -- | २१६.६७ | १८२.२३ |
| | एकूण | १३०९.०१ | १६७६.०४ | २१६२.७९ | ३२४३.३३ | ३८३०.९० | ४०२३.५३ | ४५८२.३५ |

बँक सभासदांना, शिक्षण, घर खरेदी, प्लॉट खरेदी, शेती खरेदी, बांधकाम, व्यापार उद्योग विकास, आजारपण, वाहन खरेदी, मशिनरी खरेदी इत्यादी कारणाकरीता कर्ज उपलब्ध करून देते. **बँकेने शिक्षणाकरिता १८ लक्ष रूपये महत्तम मर्यादा केली आहे. नविन कार खरेदी करीता १० वर्ष मुदती करीता दिर्घमुदती परतफेडीचे** कर्ज योजना विविध शासकिय, निमशासकिय सेवेत काम करणाऱ्या व्यक्तिंसाठी केवळ आपल्याच बँकेमध्ये आहे. तसेच नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना कृषीमाल तारण कर्ज, घर बांधणे, शेती विकास करणे व लग्नाकरिता कर्ज बँक देत आहे. **कोणत्याही व्यक्तीस सोने तारण कर्ज सोन्याच्या बाजार भावाच्या ६०% तात्काळ देण्याची सुविधा बँकेने अनेक ग्राहकांना उपलब्ध करून दिली आहे.**

अहवाल वर्षात १३.८९% वाढ कर्ज वाटपात झाली. प्रामुख्याने सदर ४५८२.३५ लक्ष कर्ज रकमेमध्ये ० ते ६ महिन्यात ९.२८% रक्कम, ६ महिने ते १ वर्ष २१.८२% रक्कम, १ ते ३ वर्षात २४.०८% रक्कम, ३ ते ५ वर्षामध्ये ११.९६% तर ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीमध्ये ३२.८६% रक्कम परतफेड करणे अपेक्षित आहे.

## ◉ कर्जवितरण व एन.पी.ए. तरतुद :

बँकेने अहवाल वर्षात बँकेच्या अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए.) मापदंडानुसार एकूण रू. ८१७.६३ लक्ष रूपये एन.पी.ए. कर्ज ठरविलेले असून नक्त अनुत्पादक कर्ज १.३० टक्के आहे. बँकेने चालु वर्षीच्या नफ्यातुन एन.पी.ए. तरतुद रू. २६.२९ (लाख) केलेली आहे. बँकेजवळ एकूण रू. ७६८.२२ लक्ष वाईट व संशयित बुडीत कर्जासाठी तरतूद आजपर्यंत जमा आहेत. संवेधानीक ऑडीटर यांनी बॉर्डर लाईन प्रकरणे गृहीत धरल्याने एन. पी. ए. मध्ये मुळ कर्जात रू. २१२.६३ लक्ष वाढ झालेली आहे, ही वाढ १.०६ टक्के आहे. संवैधानिक ऑडीटर नुसार नक्त अनुत्पादक कर्ज ६.१२ % आहे. अहवाल वर्षात अनुत्पादक जिदंगीचे खातेनियमित वसुली करण्यासाठी **"कर्ज वसुली पथके"** तयार करण्यात आली व थकित कर्जदारांना भेटी देणे, समजावून सांगणे, कोर्टात प्रकरण दाखल करणे सुरू आहे.

**सन २०१०-११ मध्ये रिझर्व बँकेचे नियमानुसार तीन महिन्यात किस्त किंवा व्याज न आल्यास खाते अनुत्पादक समजण्यात येत आहे.**

**बँकेचे नक्त अनुत्पादक कर्ज (एनपीए) किमान ३ टक्केपेक्षा कमी असणे चांगल्या बँकेचे लक्षण आहे. यासाठी कर्जदार सभासदांच्या नियमित कर्ज फेडीची मनापासुन साथ पाहिजे. बँकेने सामोपचार पध्दतीने कर्ज निरंक करण्याचे धोरण तयार केले आहे. थकित कर्जदारांना एकमुस्त रक्कम भरल्यास व्याजामध्ये बँकेच्या परतफेड धोरणानुसार सुट देण्यात येत आहे. थकित कर्जदारांनी त्वरीत संपर्क साधावा व बँकेस सहकार्य करावे. कर्जदारांच्या जमानतदारांनी सुद्धा थकीत कर्जदारांना वैयक्तिक संपर्क साधून बँकेस एन.पी.ए. कमी करण्यास मदत करावी.**

## ◉ एन. पी. ए. कमी करण्याकरीता उपाय :

आपल्या बँकेचे एनपीएचे प्रमाण कमी करण्याकरीता बँकेचे कर्जदार ह्यांनी त्यांच्या अडचणींची बँकेला कल्पना द्यावी व तत्परतेने खाते सुरळीत करण्याकरीता तात्काळ कार्यवाही करावी, ही विनंती. कर्ज खात्यामध्ये मुद्दल व व्याज नियमितपणे भरलेले असावे. खात्यामध्ये सुरळीतपणे व्यवहार सुरू करावे. मासिक किस्त न भरलेल्या कर्जदारांनी तात्काळ संपर्क साधून खाते नियमित करावे. **थकित खातेधारकांनी आपले खाते पुर्नरचित करण्याकरीता अर्ज सादर केल्यास विचार होईल.**

बँकेचे कॅश क्रेडीट सुविधा उपभोगणारे कर्जदार, सभासद त्यांच्या व्यवसायाच्या मागणीनुसार उचल करतात परंतु कधी कधी रक्कम कमी असतांना त्यांचे खात्याअंतर्गत जास्त मागणी (ओव्हर ड्राफ्ट) करतात. तसेच परस्पर बँकेची मंजुरी न घेता धनादेश देतात व धनादेश परत केल्यानंतर बँक सहकार्य करीत नाही असे ओरड करतात. ***कोणत्याही प्रकारचे मंजूर कर्जापेक्षा जास्त उचल देण्यास रिझर्व बँकेने निर्बंध लावलेले असल्याने सभासदांनी अशा प्रकारे ओव्हर ड्राफ्ट न घेता स्वत:मध्ये आर्थिक शिस्त आणावी व नियमानुसार खाते, व व्यवहार सुरू ठेवावे. तसेच नियमित कालावधीमध्ये नुतनीकरण करून घ्यावे.***

## सन २०११-१६ बँकेची अविरोध सार्वत्रिक निवडणूक :

सन २००६ ते एप्रिल २०११ पर्यंत दुसऱ्या संचालक मंडळाचा कार्यकाळ होता. सन २०१० च्या आमसभेनंतर श्री. अविनाश कोठाळे, अध्यक्ष म्हणून तर **सौ. डॉ. प्रतिभाताई साहेबराव विघळे,** उपाध्यक्षा, संचालक मंडळाने अविरोध निवड केली. ह्यापूर्वी उपाध्यक्ष म्हणून **ईजि. राजेंद्र शंकरराव जाधव** यांनी काम पाहिले व तद्नंतर बँकेच्या तिसऱ्या संचालक मंडळाची सार्वत्रिक निवडणूक फेब्रुवारी मार्च २०११ मध्ये नियोजित होती. ह्यामध्ये **श्री. प्रमोद भिमराव बोके, श्री. शरद अमृतराव बंड, श्री. सुनिल रामकृष्ण चाफले, श्री. संजय विश्वनाथ ढोरे, श्री. अनिल अनंतराव टाले व श्री. अरविंद दत्तात्रय गावंडे, सौ. किरणताई उमेशराव महल्ले, श्री. अविनाश अंबादासराव कोठाळे, श्री. राजेंद्र शंकरराव जाधव, सौ. प्रतिभाताई साहेबराव विघळे, श्री. प्रदिप चतुरसिंग वानखडे, श्री. सतिश रामदास काळमेघ, सौ. सुजाताताई भाऊराव वावरे, ॲड. रविंद्र पुंडलिकराव तायडे, श्री. राजेंद्र पुंडलिकराव अढाव** हे निवडून आलेत.

संचालक मंडळातील **डॉ. श्री. अनिल सुखदेवराव बोंडे, श्री. दिनकर जानरावजी भुगूल, श्री. एकनाथराव ज्ञानेश्वरराव मोहोड, सौ. विमलाताई गणराज अढाऊ, डॉ. वसंत नामदेवराव लवणकर, प्रा. अनिल मधूकरराव बंड, श्री. भास्करराव अमृतराव चौधरी** यांना भावपूर्व निरोप देण्यात आला.

बँकेच्या संचालक मंडळामधे नेहमीच एक संघता कामाप्रती, बँकेप्रती एक निष्ठता राहीली आहे. अविरोध सार्वत्रिक निवडणुकीनंतर बँकेच्या एप्रिल २०११ ला अध्यक्ष, उपाध्यक्षपदाची सभा श्री. अ.शं. उल्हे, उप निबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांचे प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. सदर सभेमध्ये अध्यक्ष म्हणुन **श्री.अरविंद दत्तात्रय गावंडे** तर **सौ.किरणताई उमेशराव महल्ले** यांची उपाध्यक्ष म्हणुन निवड करण्यात आली.

मागील संचालक मंडळाचा सन २०१०-११ चा आर्थिक वर्षातील कारकिर्दीचा सदर ताळेबंद आहे.

## बँकेस अतिथींचे भेट आणि आभार :

बँकेचा १० वा ''वर्धापन दिन'' मोठ्या उत्साहात विजयादशमीच्या शुभपर्वावर साजरा करण्यात आला त्यानिमित्त आयोजीत कार्यक्रमात **उद्योजक, श्री वामनराव जाधव, संस्थापक, अमरावती इंजिनीअरींग इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, अमरावती** हे उपस्थित होते. अहवाल वर्षात जिजाऊ स्मृतिदिनाला **प्रमुख पाहूणे श्री. प्रविण ना ठाकरे, तहसिलदार अमरावती** हे उपस्थित होते, जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त **प्रसिद्ध उद्योजक व बँकेचे उपाध्यक्ष श्री. राजेंद्र जाधव, प्रमुख अतिथी होते.** तसेच या प्रसंगी द्विवंगत सभासद बबन महादेवराव बोंदरकर जिजाऊ बँकेच्या सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत त्यांची पत्नी वनमाला बबन बोंदरकर व त्यांचा मुलगा राहुल बोंदरकर यांना १० हजार रुपये प्रमुख अतिथी मा. श्री वामनराव जाधव यांच्या हस्ते देण्यात आले.

## इतर उपक्रम :

### १) राष्ट्रमाता माँ जिजाऊ स्मृती बुद्धीबळ स्पर्धा :

सन २००४ पासुन बँक, राष्ट्रमाता राजमाता माँ जिजाऊ यांच्या स्मृती दिना निमित्त **''जिजाऊ स्मृती बुद्धीबळ स्पर्धा ''** आयोजन सातत्याने करीत आहे. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे बुद्धीबळ पटू अमरावती शहरात निर्माण होऊन बुद्धीबळ खेळाचा प्रसार व्हावा व बाल वयात **राष्ट्रमाता माँ जिजाऊंनी ज्या प्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांना घडविले तद्वतच राष्ट्रप्रेम, राष्ट्रोध्दार व राष्ट्रविकासाकरीता अविरत संघर्ष करणारे नवयुवक व स्वतंत्र राष्ट्राचे सुजान नागरीक घडविण्याकरिता चांगले संस्कार नविन पिढीवर व्हावेत हा स्पर्धा आयोजनाचा उद्देश आहे.** अहवाल वर्षात बँकेने जुलै २०१० या काळात बुद्धीबळ स्पर्धेचे आयोजन केले होते. सदर स्पर्धेचे उद्घाटक मा. श्री

**भोसले साहेब, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती** होते तर स्पर्धेचा बक्षिस वितरण समारोह प्रमुख पाहूणे **मा. श्रीमती श्वेता खेडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त,** अमरावती यांचे शुभहस्ते करण्यात आला. स्पर्धेमध्ये एकुण १२५ खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

**२) भागधारकांना विमा संरक्षण :**

बँकेने सर्व भागधारकांचे विमा संरक्षण केले आहे. **सदर योजनेअंतर्गत भागधारकांचा कोणत्याही प्रकारे नैसर्गिक, अपघाती मृत्यू झाल्यास त्यांचे कुटुंबीयांना रूपये १० हजार प्रदान करण्यात येतात.** सभासदांचे बँकेत बचत खाते आपल्या वारसाची नोंद, व विम्यामध्ये आपल्या नावाची नोंद करणे अनिवार्य आहे.

## ◉ नविन शाखा :

अहवाल वर्षात बँकेने पाच नविन शाखांकरिता प्रस्ताव सादर केला होता. आर.बी.आय. चे मापदंडानुसार अस्तित्वात असलेल्या एकुन बँक संख्येच्या १०% शाखा बँक नफ्यात असल्यास देण्यांत येतात. त्यानुसार बँकेला भारतीय रिझर्व बँकेचे पत्र क्र. राबैनि.बाग लाइसैंस. स ३३३७/१५.०२.११९/२००९-१० दि. ३१/०३/१० नुसार **अकोला मध्ये शाखा उघडण्याची परवानगी नुकतीच प्राप्त झालेली आहे.** त्यानुसार दिनांक २४ एप्रिल २०११ पासुन अकोला शाखा कार्यन्वित करण्यात आली.

बँकेला अहवाल वर्षात अकोला शहरामध्ये अकोला शाखा उघडण्याची परवानगी मिळाल्याने शाखा अकोला, हर्ष संकुल सिव्हील लाईन रोड, अकोला समोर सुरू केली आहे. आपल्या बँकेच्या शाखेला अल्पावधीतच लोकप्रियता मिळाली असुन या शाखेचा लोकार्पण सोहळा २४ एप्रिल २०११ ला मा. पुरूषोत्तम खेडेकर, संस्थापक अध्यक्ष मराठा सेवा संघ यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिगेडियर सुधिर सावंत यांचे हस्ते व ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत मा. श्री संजय धोत्रे, खासदार अकोला व मा. श्री गोवर्धन शर्मा, आमदार, मा. श्री पुरूषोत्तम तायडे, जिल्हाध्यक्ष मराठा सेवा संघ, मा. श्री प्रकाश पोहरे, एडिटर अॅन्ड चिफ दैनिक देशोन्नती, मा. श्री भागवत मस्के, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग अकोला यांच्या शुभहस्ते घेण्यात आला. ह्या कार्यक्रमाला अकोला शहकरातील हजारो हितचिंतक उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री पुरूषोत्तम खेडेकर साहेब यांनी कुशल नेतृत्व, Pay Back To Society या निःस्वार्थ भावनेने काम करणाऱ्या संचालक मंडळामुळे बँकेने प्रगती केली असल्याचे सांगुन पुढील दशकात व भविष्याचा वेध घेवून नविन उद्योजक निर्माण करण्यावर लक्ष केंद्रीत करण्यांचा मौलीक सल्ला दिला. अतिथींचे मनःपुर्वक आभार. मुख्य शाखा व गाडगे नगर शाखेत Core Banking असल्याने ग्राहकांना कोणत्याही ठिकाणी व्यवहार करता येतात.

## ◉ ऋणनिर्देश व आभार :

बँकेच्या यशामध्ये जिजाऊ बँकेचे सन्माननीय भागधारक, बँकेचे ठेवीदार, खातेदार, व्यापारी उद्योजक, दैनंदिन ठेवी जमा करणारे दैनिक संग्राहक, कर्मचारी वर्ग, कर्जाची नियमित परतफेड करणारे कर्जदार सभासद, ग्राहक व सर्वक्षेत्रातील हितचिंतक यांचा बहुमोल वाटा असुन त्यांचे ऋणनिर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो. बँकेच्या मागणी पत्रानुसार वसुली पाठविणारे सर्व कार्यालयाचे तसेच प्रामुख्याने सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा, जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी, इत्यादी कार्यालयातील प्रमुख व वसुलीशी निगडीत कर्मचारी या सर्वांचे सहकार्याबद्दल आभार.

**रिझर्व बँक ऑफ इंडियाचे यु.बी.डी. नागपूरच्या श्रीमती इंदूरकर मॅडम, उपमहाप्रबंधक श्रीमती यशोदा मॅडम व श्री. उल्हे साहेब, व श्री मोयर** सहनिबंधक, **श्री भोसले,** जिल्हा उपनिबंधक, तालुका उपनिबंधक **सौ. संगिता डोंगरे** यांनी तसेच त्यांचे कार्यालयीन कर्मचारीवृंद जिल्हा व विशेष लेखा परिक्षक

**श्री चौधरी**, अमरावती व ज्यांचे सकारात्मक सहकार्य बँकेला सातत्याने लाभत आहे याबद्दल सर्वांचे मन:पुर्वक आभार.

बँकेला सहकार्य करणारे स्टेट बँक ऑफ इंडीया, अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, महाराष्ट्र स्टेट को.ऑप बँक, तथा आय.डी.बी.आय., एच.डी.एफ.सी., युको बँक, बँक ऑफ बडोदा यांचे अधिकारी व कर्मचारी वृंदांचे सदैव सहकार्य मिळत असल्याने त्यांचे आभार ! संगणक समितीचे **अभियंता प्रशांत बारबुद्धे, अभियंता अभिजीत इटकीकर** यांचे सुद्धा मन:पुर्वक आभार. बँकेशी संबंधीत सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयाचे प्रमुख व कर्मचारी वर्ग, **मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड व संभाजी ब्रिगेडच्या** सर्व सभासदांनी बँकेला मदत केल्याबद्दल आभार. **अमरावती शहरातील सर्व वृत्तपत्र संपादक, जिल्हा प्रतिनिधी, वार्ताहर** ज्यांचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष बँकेला सहकार्य प्राप्त झाले त्यांचे सुद्धा आभार. बँकेच्या यशात सहभागी प्रत्येक ज्ञात व अज्ञात हितचिंतकांचे मन:पुर्वक आभार. **मा.श्री. पुरुषोत्तम खेडेकर साहेब, संस्थापक अध्यक्ष मराठा सेवा संघ यांचे अविरत मार्गदर्शन व नाविण्यपूर्व समाज सुधारणा दृष्टीकोण सदैव प्रेरणादायी राहील हा विश्वास आहे!** त्याबद्दल त्यांचे मन:पुर्वक विशेष आभार.

## ◉ समारोप

मराठा सेवा संघाच्या अर्थकक्षाचा एक भाग म्हणून **अर्थ संपन्न समाज निर्मीती करिता जिजाऊ बँकेची स्थापना** हे आधुनिक उन्नतम् मुल्यांचा लोकशाहीतील एक आदर्श आहे ! नि:स्वार्थी, समाजाप्रती जागृत, स्वहितापेक्षा समाजहिताची उदात्त संकल्पना घेवून कृतीशीलता दर्शविणारे महानुभाव समुहाच्या कल्याणास प्राधान्य देतात हि गौरवाची बाब आहे ! सभासदांच्या **सकारात्मक सहकारातुनच अर्थसंपन्न राष्ट्र घडविता येते !** बँकेप्रती आपण सर्वच कटीबध्द होवून मुल्याधिष्टीत नवा सहकार समाज सहकाराच्या या यशोरथाद्वारे निर्माण करण्याकरीता **एकमेका सहाय्य करू आणि अवघे राष्ट्रची सुराज्य करू !**

राष्ट्रमाता माँ जिजाऊंच्या छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व राष्ट्रासाठी बलीदान देणाऱ्या असंख्य विरांना स्मरूण आपण निर्माण करूया नवा भारत ! विकसित भारत !
सहकार्याच्या अपेक्षेने!
सदिच्छा पुर्वक अहवाल सादर.

**जय जिजाऊ ! जय शिवराय ! जय सहकार !**

**संचालक मंडळाच्या वतीने**
आपला स्नेहांकित,
**अरविंद दत्तात्रय गावंडे**
अध्यक्ष

**सहकारी बँकेचा नावलौकीक नि:स्पृह सेवावृत्तीने व विश्वस्त म्हणुन काम करणाऱ्या संचालकांवर असतो !**

# जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकच्या यशस्वीतेचे सिंहावलोकन व पुढील आव्हाने

ईंजि. अविनाश अं. कोठाळे
संस्थापक अध्यक्ष

सन्माननीय सभासद
बंधु व भगिनींनो,
स्नेहपुर्वक जय जिजाऊ !

आपल्या जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेच्या यशस्वी दशकपुर्तीनंतर ११ व्या आमसभेमध्ये आपल्या सर्वांचे मनःपुर्वक स्वागत! राष्ट्रमाता माँ जिजाऊच्या कर्तुत्वाच्या स्मृतीना आधुनिक पिढीने २१ व्या शतकात "Pay Back To Society" या मराठा सेवा संघाच्या ब्रिद वाक्याने सहकार क्षेत्रात एका यशस्वी नागरी बँकेची उभारणी करणे, एका दशकामध्ये आधुनिक बँकींग स्पर्धेला तोंड देत समर्थपणे स्वतःची ओळख निर्माण करणे व एकसंघ , एकजिद्द, सर्वानुमते बहुजन हिताय बहुजन सुखाय हा घोषानुसार तन,मन,धन व कर्तव्य भावनेने सामाजिक जाणीवेने माझ्या ११ वर्षाच्या अध्यक्षपदामधे माझ्या सर्वच सहकारी संचालकाचा त्याग, निस्पृह सेवावृत्ती यावर मला सार्थ अभिमान वाटतो.

मी सातपुडी जिल्हातील अभियंता पतसंस्थेचा ६ वर्ष अध्यक्ष व १० वर्ष संचालक असतांना माझी भेट माझे मित्र श्री अभियंता अरविंदराव गावंडे यांनी मा. श्री. पुरुषोत्तम खेडकर या समाजशिल्पी अभियंता समवेत बँक या विषयावर घडवून आणली व मला मराठा सेवा संघाच्या विचारांची बँक आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. तत्कालीन १९९६ च्या जिल्हा कार्यकारणीने मला सर्व अधिकार बँकेविषयी प्रदान केले. मराठा सेवा संघाचे सचिव दिनकर भुगूल, जिजाऊब्रिगेडच्या सौ. विमलताई अढाऊ, मराठा मार्गचे अरविंद गावंडे, जिल्हाध्यक्ष बळी साहेब या सर्वांच्या सोबतीने विचार अंमलात आणण्याच्या दृष्टीने कृतीशिल कार्यास प्रारंभ करुन समाजाच्या सर्वत्र क्षेत्रातील मंडळींना सोबत घेऊन कार्य सुरु झाले. बँक निर्मितीच्या प्रत्यक्ष प्रक्रियेस सन १९९६ मधे केंद्रीय अर्थ संकल्पातील मुक्त अर्थव्यवस्थेअंतर्गत सहकार क्षेत्र मजबुत करण्याच्या वृत्तीने राष्ट्राचा इकोनॉमिक विकास साधण्याकरीता सहकारी बँकांची जाळे निर्मितीची सहकाराचा संकल्पना विचारात घेवून चार्टर्ड अकौन्टंट श्री विजय जाधव यांच्या सहकार्याने सन १९९९ मध्ये बँक प्रस्तावास मुर्हूत मेढ रोवून मराठा कमर्शियल को-ऑप. बँकचे नांव जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक जिल्हा अमरावती करुन सन २००० मध्ये कार्यास प्रारंभ झाला तो क्षण होता अत्यंत आनंदाचा ! आर्थिक संकल्पनांचा प्रथम पाया रचण्याचा !

बँकेचा बोर्ड नाही लोकांकडून प्रत्येकी रु. २०००/- भागभांडवल घेवून सर्वश्री माझे संचालक सर्वश्री, राजेंद्र जाधव, दिनकर भुगूल, अरविंद गावंडे, डॉ. सुनिलभाऊ देशमुख, डॉ. अनिल बोंडे, श्री. रामभाऊ बळी, श्री. अनिल बंड, कै. गजानन बंड, सौ. विमलाताई अढाऊ, ॲड. अनिल कडू, सौ. किरणताई महल्ले, सौ. प्रतिभाताई थिथळे, सौ. सुजाताताई वावरे, एकनाथराव पोहोड, बाळासाहेब वैद्य, प्रदीप वानखडे या सर्वांच्या सहकार्याने सुरु झाली होती. भागभांडवल गोळा करण्याचे प्रयत्न अवघ्या दोन महिन्यात किमान पंधरा लक्ष ऐवजी चोवीस लक्ष जमा झाले हा तर सर्वसाधारण सभासदांनी टाकलेला विश्वास ! जनसामान्यांच्या विश्वासाला द्विगुणीत करण्याचे काम माझ्या सर्वच संचालकांनी केले व प्रत्येक वर्षी पाच कोटी ठेवींची वृध्दी करीत आज बँक सत्तर कोटी ठेवी ५० कोटीचे कर्जवाटप सातत्याने १५ टक्के लाभांश देणारी बँक म्हणुन उदयास आली बँकेच्या भाग धारकाचा विश्वास इतका वाढला की

१.५ कोटीचे भागभांडवल ३९०० सभासदांच्या विश्वासाने झाले. बँक अत्यंत भक्कम स्थितीत असुन बँकेचे गंगाजळी व इतर निधीचे ११.०० कोटी कोणत्याही भविष्यातील धोक्यास समर्थपणे पेलण्यास सज्ज आहे. आजवर १ लक्ष भागभांडवल देणारी मंडळी आहे परंतू बँकेचे अस्तित्व नसतानाही माझ्यावर दाखविलेला विश्वास माझ्या भागधारकांच्या ऋणात मी सदैव राहील ! बँक कोणत्याही एका समुहाची नसते, बँक सर्व सामान्य नागरीकांची असते तेव्हा बँकेने सर्व स्थरावरील नागरीकांना आर्थिक दिलासा दिला आहे.

सहकाराचा हा यशोरथ लोकशाही पद्धतीने चालवितांना सन २००१, २००६, २०११ अविरोध निवडणूका अविस्मरणीय आहेत. तीच परंपरा भविष्यातही राहील असा मला संस्थापक या नात्याने विश्वास आहे. सभासदांच्या विश्वासानी बँकेस आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले. आम्ही सर्व संचालक विश्वस्त म्हणुन सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाची पावती आहे. बँकेच्या २०१० व २०११ दोन नविन शाखा विस्तार बँकेला जिल्हा बाहेर घेवून गेल्यात दोन्ही शाखा यशस्वी असुन भविष्यात प्रत्येक जिल्ह्यात एक शाखा उभारण्याचे संकल्प आहे. कोणतीही संस्था एका व्यक्तिवर अवलंबून नको हे माझे प्रमाणिक मत आहे. सहकारामध्ये पदाधिकारी १० वर्षापेक्षा सलगपणे नको अशा माफक संकल्पना स्वतः मी अमलात आणण्याकरिता मागील वर्षीपासुन प्रयत्नात होतो. मला यश आले व माझा मित्र प्रामाणिकपणे समाजाची बांधीलकी जागत असल्याने इंजि. अरविंदराव गावंडे यांचे कडे अध्यक्ष पदाची धुरा देण्यात मला थोडीशीही संकोच वाटला नाही. त्यांनी आनंदाने जबाबदारी स्विकारली हा बहुमान काटेरी मुकुटाचा आहे याची जाणीव माझ्या सर्वच संचालकांना आहे. गेल्या १० वर्षात मी निश्चितपणे प्रत्येक सभासदाचे ठेवीदाराचे हित जोपासण्याचा प्रयत्न केला. अनावधानाने रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार सक्तीने कर्ज वसुली करावी लागली असेल, त्यात वैयक्तिक निश्चितपणे कोणताही संचालकाचा आकस नाही हे मी अभिमानाने सांगतो. परंतू त्या बद्दल एखाद्या सभासदास वाईट वाटल्यास क्षमस्व!

भविष्याचा वेध घेतांना आपल्या बँकेला अनेक आव्हाने सहकारक्षेत्रात आहेत. नक्त अनुत्पादक कर्ज, नेट एन.पी.ए. १.६ टक्के असतांना एकत्रित अनुत्पादक कर्ज १७ टक्के पर्यंत वाढणे हा चिंतेचा विषय आहे. कर्ज प्रकरणी शुल्लक चुका सुधारून कर्ज वसुलीचे आटोकाट प्रयत्न करणे गरजेचे आहे. बँकेचा वाढता व्याप लक्षात घेता कार्पोरेट कार्यसंस्कृती सकारात्मक कार्यसंस्कृती, आधुनिक स्पर्धेत टिकण्याकरिता नेट बँकींग, ए.टी.एम. बँकींग सामाजिक उपक्रमाद्वारे जिजाऊचा आदर्श घराघरात, मनामनात व नागरीकामध्ये पोहचविणे सुद्धा जबाबदारी आहे. तरी मला ११ व्या आमसभेमध्ये आपली बँक बाल्य व्यवस्थेतून संक्रमन संपवून नविन क्षितीजावर उत्तरोत्तर प्रगती करेल हा विश्वास आपल्या सर्वांच्या सहकार्याच्या बळावरच आहे ! नविन मुल्य, नविन संकल्पना, आधुनिकतेचे स्वप्न उराशी बाळगून आपण सर्व यशस्वी होवून एक मेका साहाय्य करु अवघे धरु सहकाराला सुपंथ!

सदीच्छापुर्वक सादर !

आपला नम्र,

अभियंता अविनाश अ. कोठाळे

संस्थापक, अध्यक्ष

# JIJAU COMMERCIAL CO-OPERATIVE BANK LTD. AMRAVATI
## FORM "A" AUDITED BALANCE SHEET AS ON 31/03/2011

| AMOUNT 31/03/2010 | LIABILITIES | AMOUNT 31/03/2011 | AMOUNT 31/03/2010 | ASSETS | AMOUNT 31/03/2011 |
|---|---|---|---|---|---|
| 5,00,00,000=00 | AUTHORISED SHARE CAPITAL | 5,00,00,000=00 | 8118841.00 | CASH BALANCE | 10444353.00 |
| 29731567.00 | CAPITAL | 34244167.00 | 66162895.56 | BANK BALANCE | 25950866.65 |
| | SHARES | | 1482830.58 | A.D.C.C. BANK (C/A) | 465512.58 |
| 99745779.93 | RESERVE FUNDS AND OTHER RESERVES | 105626385.82 | 124328.92 | AMT. M.S.CO-OP. BANK (C/A) | 945785.21 |
| 500000.00 | AMORTIZATION FUND | 500000.00 | 97104.01 | AXIS BANK AC NO.7115 | 0.00 |
| 74141479.42 | BAD & DOUBTFUL DEBT RESERVE | 75588254.97 | 36912.88 | AXIS BANK BANK A/C 7108 | 0.00 |
| 650000.00 | BOARD MEETING & WELFARE FUND | 650000.00 | 379039.56 | AXIS BANK C/A 7092 | 2915.68 |
| 6228643.80 | BUILDING FUND | 8628085.14 | 60751.22 | C/A WITH I.D.B.I. BANK, NAGPUR | 116823.52 |
| 1000000.00 | CONTIGENT PROV. FOR STANDARD ASSEST | 1236109.00 | 108845.00 | C/A WITH PANJAB NATIONAL BANK | 0.00 |
| 188000.00 | DEATH RELIEF FUND | 238000.00 | 5157782.00 | C/A WITH BANK OF BARODA | 11510474.02 |
| 200000.00 | DIRECTOR TRAINING & TOUR WELFARE FUND | 200000.00 | 19980.74 | H.D.F.C. BANK, NGR (C/A) | 157824.70 |
| 602321.00 | DIVIDEND EQUILISATION FUND | 652321.00 | 754058.00 | ICICI BANK | 81043.00 |
| 200000.00 | DIVIDENT CONTIGENT FUND | 200000.00 | 6282947.49 | MUMBAI M.S.CO.-OP. BANK (C/A) | 6102101.78 |
| 885586.04 | INVESTMENT DEPRECIATION RESERVE | 1785586.04 | 6344.81 | NAGPUR M.S.CO.-OP. BANK (C/A) | 0.00 |
| 3112807.17 | INVESTMENT FLUCTUATION FUND | 3162807.17 | 99150.00 | SBI-AGRICULTURE ADB | 0.03 |
| 300000.00 | JIJAU PROMOTIONAL FUND | 300000.00 | 38825258.72 | STATE BANK OF INDIA (C/A) | 7069755.99 |
| 1400000.00 | LOAN CONTIGENT FUND | 1400000.00 | 4244187.00 | THE BANK OF RAJASTHAN LTD. AMRAVATI | 0.00 |
| 150000.00 | NATURAL CALEMITY FUND | 150000.00 | 12480.53 | UCO BANK (C/A) | 8622.53 |
| 5741881.50 | RESERVE FUND | 7244361.50 | 543622.70 | HO - FLOATING AC | 4535714.34 |
| 300000.00 | SHARE HOLDER ANNUAL GATHERING | 300000.00 | 543622.70 | HEAD OFFICE | 4535714.34 |
| | & PRIZE FUND | | 231789003.00 | INVESTMENTS | 346711940.00 |
| 706158.00 | SHARE HOLDER WELFARE FUND | 706158.00 | 72098180.00 | A.D.C.C. (F.D.R.) | 57695180.00 |
| 500000.00 | SOCIAL WELFAIR FUND | 500000.00 | 1000.00 | A.D.C.C. BANK AMT.(SHARES) | 1000.00 |
| 0.00 | SPECIALRESERVE FUND U/S 36(VIII) | 347000.00 | 36550000.00 | AMRAVATI M.S.CO-OP.BANK (F.D.R.) | 36550000.00 |
| 939000.00 | STAFF WELFARE FUND | 939000.00 | | | |



जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती.

AMOUNT | AMOUNT | ASSETS | AMOUNT 31/03/2011

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती.

| AMOUNT 31/03/2010 | LIABILITIES | AMOUNT 31/03/2011 | AMOUNT 31/03/2010 | ASSETS | AMOUNT 31/03/2011 |
|---|---|---|---|---|---|
| 173603114.50 | **DEMAND DEPOSITS** | 191553105.63 | 51400000.00 | BANK OF BARODA (F.D.R.) | 51400000.00 |
| 30129958.32 | CURRENT DEPOSIT | 26888252.17 | 37631823.00 | FDR WITH IDBI BANK, NAGPUR | 15379260.00 |
| 0.00 | CURRENT DEPOSIT(ADD TO DR) | 0.00 | 0.00 | GOVERNMENT SECURITIES | 182275500.00 |
| 2895457.38 | JIJAU SAVING LINK DEPOSIT | 12863008.08 | 10000.00 | M.S.CO.OP. BANK, MUMBAI (SHARES) | 10000.00 |
| 140446378.80 | SAVING DEPOSIT | 151670525.38 | 34100000.00 | SBI MAINBR. AMT. (F.D.R) | 4000000.00 |
| 131320.00 | STAFF SECURITY DEPOSIT | 131320.00 | 25626.00 | **DEMAND DEPOSITS** | 26066.00 |
| 438400916.00 | **TIME DEPOSITS** | 474912086.00 | 25626.00 | CURRENT DEPOSIT | 26066.00 |
| 0.00 | CHATRAPATI SHIVAJI MAHARAJ MONTHLY INCOME PLAN | 110000.00 | 402352950.36 | **LOANS & ADVANCES** | 459343532.73 |
| 9927169.00 | DAILY RECURRING DEPOSIT | 17435456.00 | 116660.00 | ADVANCE TO STAFF | 77998.00 |
| 29380428.00 | DOUBLE BENEFIT DEPOSIT | 39234457.00 | 0.00 | AG. JIJAU COMPOUNDING PLAN | 5123.00 |
| 0.00 | JIJAU COMPOUNDING PLAN | 45420604.00 | 0.00 | AGAINST DAILY RECURRING DEPOSIT | 127084.00 |
| 0.00 | JIJAU JANMOTSAV THEV YOJNA 2011 | 12645134.00 | 693861.00 | AGAINST DOUBLE BENEFIT DEPOSIT | 574467.00 |
| 0.00 | JIJAU MONTHLY INCOME PLAN | 340150.00 | 0.00 | AGAINST DOUBLE BENEFIT DEPOSIT (ADD TO CR) | 3500.00 |
| 15298423.00 | JIJAU THEV YOJNA | 11608644.00 | 4049616.00 | AGAINST GOVERNMENT SECURITIES | 2592935.67 |
| 49379058.00 | MONTHLY INCOME PLAN | 58995199.00 | 12504.00 | AGAINST JITY | 0.00 |
| 1373458.00 | MONTHLY RECURRING DEPOSIT | 1791705.00 | 0.00 | AGAINST JTY | 80062.00 |
| 1549050.00 | RAJSHREE SHAHU SHIKSHAN YOJNA | 1049050.00 | 2128727.00 | AGAINST MONTHLY INCOME PLAN | 1825286.00 |
| 7752726.00 | RASHTRMATA JIJAU SWABHIMAN THEV YOJNA | 702094.00 | 25515.00 | AGAINST MONTHLY RECURRING DEPOSIT | 11202.00 |
| 15467106.00 | SANT TUKARAM ARTH VRUDHI YOJNA | 8834774.00 | 41190.00 | AGAINST RJSTY | 0.00 |
| 3673000.00 | SANT TUKARAM SMRUTI THEV YOJNA | 2873000.00 | 6910011.00 | AGAINST SHORT TERM DEPOSIT | 9610432.00 |
| 268471465.00 | SHORT TERM DEPOSIT | 264313890.00 | 0.00 | AGAINST SHORT TERM DEPOSIT (ADD TO CR) | 46.00 |
| 11010419.00 | SPECIAL FIXED DEPOSIT | 8159115.00 | 549616.00 | AGAINST V.S.D. | 0.00 |
| 27118614.00 | VARDHAPANDIN SPECIAL DEPOSIT | 1398814.00 | 14737058.00 | AGRICULTURE LOAN | 21103057.00 |
| | | | 0.00 | AGRICULTURE LOAN(ADD TO CR) | 13535.00 |

| AMOUNT 31/03/2010 | LIABILITIES | AMOUNT 31/03/2011 | AMOUNT 31/03/2010 | ASSETS | AMOUNT 31/03/2011 |
|---|---|---|---|---|---|
| 1309244.45 | **LOANS & ADVANCES** | 113508424 | 3475272.00 | EDUCATION LOAN | 2700630.00 |
| 0.00 | AGAINST DOUBLE BENEFIT DEPOSIT | 3500.00 | 0.00 | FESTIVAL ADVANCES | 104400.00 |
| 0.00 | AGAINST SHORT TERM DEPOSIT | 4600 | 2864459.00 | GOLD LOAN | 9535363.00 |
| 0.00 | AGRICULTURE LOAN | 13535.00 | 106253175.00 | HOUSE MORTGAGE | 119489204.00 |
| 0.00 | HOUSE MORTGAGE | 38744.00 | 0.00 | HOUSE MORTGAGE(ADD TO CR) | 38741.00 |
| 0.00 | HYPOTHECATION INSTALLMENT ACCOUNT | 4275.00 | 31587465.90 | HYPOTHECATION INSTALLMENT ACCOUNT | 22887987.00 |
| 292811.00 | CD AG.FDR | 252191.99 | 0.00 | HYPOTHECATION INSTALLMENT ACCOUNT(ADD TO CR) | 4275.00 |
| 643743.95 | SECURED CASH CREDIT | 729464.75 | 27207739.00 | LOAN AGAINST PROPERTY | 31072097.00 |
| 382681.50 | SECURED PERSONAL LOAN | 67740.50 | 8834064.01 | CD AG.FDR | 16142892.88 |
| 0.00 | UNSECURED PERSONAL SEC. LOAN | 28530.00 | 282811.00 | CD AG.FDR(ADD TO CR) | 252191.99 |
| 0.00 | VEHICAL LOAN | 3360.00 | 116842368.50 | SECURED CASH CREDIT | 80907172.21 |
| 1533243.00 | **BILLS** | 3169562.00 | 643748.95 | SECURED CASH CREDIT(ADD TO CR) | 729134.75 |
| 736723.00 | INWARD BILLS PAYABLE | 1068389.00 | 42849202.50 | SECURED PERSONAL LOAN | 62426680.65 |
| 796522.00 | OUTWARD BILLS PAYABLE | 2101173.20 | 382681.50 | SECURED PERSONAL LOAN(ADD TO CR) | 67740.50 |
| 46161080.00 | **INTEREST PAYABLE** | 49479187.00 | 4623180.20 | UNSECURED PERSONAL SEC. LOAN | 3726397.00 |
| 46161080.00 | INTEREST PAYABLE | 49479187.00 | 0.00 | UNSECURED PERSONAL SEC. LOAN(ADD TO CR) | 22530.00 |
| 316247.00 | **PAYSLIPS PAYABLE** | 1940811.00 | 32441953.00 | VEHICAL LOAN | 52811277.18 |
| 316247.00 | PAY ORDER | 1940811.00 | 0.00 | VEHICAL LOAN(ADD TO CR) | 3360.00 |
| 38849320.00 | OVERDUE INTEREST RESERVE | 60621368.45 | 1533243.00 | **BILLS** | 3169562.00 |
| 38849320.00 | OVERDUE INTEREST RESERVE | 60621368.45 | 736723.00 | INWARD BILLS RECEIVABLE | 1068389.00 |
| 6212576.00 | OTHER LIABLITIES | 7243663.40 | 795520.00 | OUTWARD BILLS RECEIVABLE | 2101173.20 |
| 195570.00 | AUDIT FEE PAYABLE | 295530.00 | 21631624.00 | **INT RECEIVABLE** | 25256585.40 |
| 411434.00 | BONUS PAYABLE | 333617.00 | 21631624.30 | INTEREST RECEIVABLE | 25356585.40 |
| 1014863.00 | DIVIDEND 2008-2009 | 873953.00 | 38849320.00 | **OVERDUE INTEREST RESERVE** | 60621368.45 |
| 757480.00 | DIVIDENT 2007-2008 | 759291.00 | 38849320.00 | INT. RECEIVABLE ON NPA | 60621368.45 |
| 0.00 | DIVIDENT PAYABLE 2009-2010 | 1018825.00 | | | |







| AMOUNT 31/03/2010 | LIABILITIES | AMOUNT 31/03/2011 | AMOUNT 31/03/2010 | ASSETS | AMOUNT 31/03/2011 |
|---|---|---|---|---|---|
| | | 41017.00 | 1023600.00 | OTHER ASSETS | 923600.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5065.00 | OFFICE EXPENSES | 79489.00 | | | |
| 5065.00 | FUNCTION / ANNEVERSARY EXPS. | 79489.00 | | | |





| AMOUNT 31/03/2010 | EXPENSE | AMOUNT 31/03/2011 | AMOUNT 31/03/2010 | INCOME | AMOUNT 31/03/2011 |
|---|---|---|---|---|---|
| 2276134.33 | OTHER EXPENDITURES | 3056793.01 | | | |
| 10000.00 | PROPOSAL FEE EXPENCES | 53000.00 | | | |
| 0.00 | INTEREST ON TOD | 1084.00 | | | |
| 825.00 | JIJAU JANMOSTAV / SMRUTIDIN | 6655.00 | | | |
| 2829.00 | OCTROI CHARGES | 1458.00 | | | |
| 2500.00 | EXPENSES FOR AMC (EPABX) | 2500.00 | | | |
| 2470.20 | EXPENSES FOR AMC (NOTE COUNT M.) | 3831.00 | | | |
| 83500.00 | FEES PAID FOR MEMBERSHIP TO ASSOCIATION | 54700.00 | | | |
| 0 | COMPUTER PERIPHERALS | 60279.00 | | | |
| 50.00 | OTHER EXPENSES | 0.00 | | | |
| 802324.00 | OTHER ESTABLISHMENT EXPENSES | 834582.00 | | | |
| 198950.00 | HOSPILITY EXPENCES | 216387.00 | | | |
| 155.00 | INAGURATION EXPENSES | 25462.00 | | | |
| 18030.00 | OTHER INSURANCE CHARGES | 44427.00 | | | |
| 6380.00 | SECURITY SERVICE CHARGES | 110372.00 | | | |
| 0.00 | MAINTENANCE CHARGES | 29675.00 | | | |
| 0.00 | OTHER CHARGES | 2840.00 | | | |
| 7331.00 | TRAVELLING EXPENSES | 5304.00 | | | |
| 40163.00 | EXPENSES FOR ANNUAL REPORT | 58040.00 | | | |
| 0.00 | EXPENSES ON ELECTION | 25000.00 | | | |
| 3500.00 | MISCELLENCES EXPENSES | 10437.00 | | | |
| 51371.00 | INS.CHARGES FOR CASH IN SAFE/TRANSIT | 57724.00 | | | |
| 0.00 | OTHER TAXES (TRADE CERTIFICATE) | 23900.00 | | | |
| 23073.00 | RECOVERY EXPS. | 0.00 | | | |
| 11772.00 | MEETING EXPENSES | 25446.00 | | | |
| 4516.00 | COMMISION PAYBLE TO DRD AGENT | 202496.50 | | | |
| 487802.00 | COMMISSION PAID TO AGENTS | 487354.00 | | | |

| AMOUNT 31/03/2010 | EXPENSE | AMOUNT 31/03/2011 | AMOUNT 31/03/2010 | INCOME | AMOUNT 31/03/2011 |
|---|---|---|---|---|---|
| 11982.00 | JIJAU SMRUTI CHESS CHAMPIONSHIP | 23335.00 | | | |
| 1982.33 | COMMISSION PAID TO BANKS | 7032.01 | | | |
| 465662.00 | OTHER COMMISSION | 693285.50 | | | |
| 115169.00 | ADVERTISEMNET EXP.& PUBLICATION | 138649.00 | | | |
| 115169.00 | ADVERTISEMENT EXPENSES & PUBLICATION | 138649.00 | | | |
| 131461.00 | LAW CHARGES | 91188.00 | | | |
| 0.00 | STAMP DUTY PAID FOR 101 CASES | 33280.00 | | | |
| 31461.00 | LEGAL EXPENSES PAID FOR COURT CASES | 57908.00 | | | |
| 20794.00 | AUDITORS FEE | 253171.00 | | | |
| 0.00 | TAXATION AUDIT FEE | 10330.00 | | | |
| 0.00 | AUDIT FEE PAID FOR AUDIT BY C.A. | 57163.00 | | | |
| 18000.00 | AUDIT FEE PAID FOR INTERNAL AUDIT | 23163.00 | | | |
| 0.00 | AUDIT FEE PAID FOR STATUTORY AUDIT | 159915.00 | | | |
| 2794.00 | OTHER AUDIT FEE | 2900.00 | | | |
| 84454.00 | DIRECTOR BOARD ALLOWANCES | 143939.00 | | | |
| 71649.00 | DIRECTOR TRAINING EXPENSES | 74249.00 | | | |
| 1400.00 | OTHER EXPENSES FOR DIRECOTR'S | 0.00 | | | |
| 11405.00 | TRAVELLING ALLOWANCE TO DIRECTOR | 63690.00 | | | |
| 17337.00 | A.G.M. EXPENCES | 102417.00 | | | |
| 7781.00 | OTHER EXP FOR A.G.M. | 74632.00 | | | |
| 9556.00 | POSTAGE FOR A.G.M. | 27785.00 | | | |
| 942008.00 | DEPRICIATION | 590379.00 | | | |
| 72088.00 | DEP FOR OTHER ASSETS | 40918.00 | | | |
| 906368.00 | DEP. FOR COMPUTERS & PERIPHERAL | 423630.00 | | | |
| 220057.00 | DEP.FOR DEAD STOCK & OTH. MOBLE ASS. | 125831.00 | | | |



जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती.

| AMOUNT | EXPENSE | AMOUNT | AMOUNT | INCOME | AMOUNT 31/03/2011 |
|---|---|---|---|---|---|

| AMOUNT 31/03/2010 | EXPENSE | AMOUNT 31/03/2011 | AMOUNT 31/03/2010 | INCOME | AMOUNT 31/03/2011 |
|---|---|---|---|---|---|
| **3100000.00** | **INT. RECI. FROM HO** | 0.00 | | | |
| 200000.00 | PROV. FOR DEATH RELIEF FUND | 0.00 | | | |
| 200000.00 | PROV. FOR DIVIDENT CONT. FUND | 0.00 | | | |
| 1000000.00 | PROV. FOR SPECIAL BDDR | 0.00 | | | |
| 1100000.00 | PROV. FOR LAON CONTIGENT FUND S.B | 0.00 | | | |
| 100000.00 | PROV.FOR SOCIAL WELFARE FUND | 0.00 | | | |
| 500000.00 | PROV. FOR AMORTISED (INVESTMENT) | 0.00 | | | |
| **82042.00** | **TRAINING EXPENCES** | 69253.00 | | | |
| 82042.00 | EMPLOYEE TRAINING EXPS. | 69253.00 | | | |
| **219861.00** | **INT. PAID ON BRANCH A/C** | 9018639.00 | | | |
| 219861.00 | INTT. PAID ON BRANCH ACCOUNT | 9018639.00 | | | |
| | Total Profit | 6966998.89 | | | |
| 77335795.30 | | 90380597.40 | 77335795.30 | | 90380597.40 |

**Sharad S. Bhokse**
Chief Executive Officer

**Satish Kalmegh**
Director

**Sau. Kirantai U. Mahalle**
VICE CHAIRMAN

**Arvind D. Gawande**
CHAIRMAN